# पनवेल मनपाची डॅशिंग नारी; अमेरिकेत ठरली सर्वात भारी

## जागतिक स्पर्धेमध्ये शुभांगीला कांस्य पदक

**पनवेल |** पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन दलातील डॅशिंग महिला कर्मचारी शुभांगी संतोष घुले यांना अमेरिका येथील अल्बामा येथे नुकत्याच संपन्न झालेल्या 21 व्या जागतिक पोलिस व अग्निशमन स्पर्धेमध्ये कांस्य पदक मिळाले आहे. उत्तुंग अशा या यशाबद्दल मनपाचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी शुभांगी यांचे विशेष अभिनंदन केले.



अल्बामा,अमेरिका येथे शुभांगी संतोष घुले यांनी भारत देशाच्या संघात सहभागी होऊन 2025 च्या 21 व्या जागतिक पोलिस व अग्निशमन स्पर्धेत "ULTIMATE FIRE FIGHTING CHALLENGE" या खेळात कांस्य पदक मिळवून भारताचे नाव पुन्हा एकदा उज्ज्वल केले.

या स्पर्धेतील तिचा हा पराक्रम देशाच्या क्रीडा क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे. अल्बामा येथे 2025 मध्ये झालेल्या या प्रतिष्ठित स्पर्धेत, जगातील अग्निशमन आणि पोलिस दलांचे उत्कृष्ट संघ सहभागी झाले होते.ही स्पर्धा अग्निशमन, पोलिस दल आणि बचाव कार्यातील व्यावसायिक कौशल्यांची चाचणी घेणारी होती. यात जगभरातून 50 देश सहभागी झाले होते. शुभांगी यांनी इतर देशांच्या स्पर्धकांशी सामना करत, या कठीण आणि तडफदार स्पर्धेत आपला जलद आणि उत्कृष्ट कामगिरीचा दाखला देत कांस्य पदक प्राप्त केले.

याआधी एप्रिल महिन्यात नवी दिल्ली येथे त्यागराज स्टेडियमवरती झालेल्या ऑल इंडिया नॅशनल फायर सर्व्हिस स्पोर्ट्स कंट्रोल बोर्डाच्यावतीने थर्ड इडिएशन ऑफ ऑल इंडिया फायर सर्व्हिसेस स्पोर्ट्स अॅन्ड फायर सर्व्हिसेस मीट 2025 मध्ये झालेल्या थाळीफेक व गोळा फेक या दोन्ही खेळामध्ये अग्निशामक शुभांगी संतोष घुले यांनी सुवर्ण पदक मिळवले होते.

या दैदिप्यमान कामगिरीबद्दल अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे तसेच महानगरपालिकेचे सर्व अधिकारी कर्मचारी यांनी शुभांगी यांचे अभिनंदन केले आहे

**शुभांगीची प्रतिक्रिया:***

**"ही स्पर्धा माझ्यासाठी एक महत्त्वाचा अनुभव होता. माझ्यासाठी माझ्या प्रशिक्षकांचा आणि कुटुंबीयांचा, महापालिकेचा पाठिंबा नेहमीच प्रेरणादायी राहिला आहे. यापुढेही मी अधिक मेहनत करून आणि भारताचे नाव उच्च ठरवण्याचे काम करीन**

# बौद्धजन सेवा संघ मांगरुळ स्थानिक व मुंबई यांच्या वतीने वृक्षारोपण उपक्रम यशस्वी

**माणगाव |** तालुक्यातील मांगरुळ येथील बौध्दजन सेवा संघाने रविवार दिनांक २९ जून २०२५ रोजी "झाडे लावा, झाडे जगवा" या महत्त्वपूर्ण पर्यावरण उपक्रमाचा यशस्वी आयोजन केला. या कार्यक्रमामध्ये निसर्ग आणि बुद्धधम्म यांचे गहन संदेश देणाऱ्या विविध मान्यवरांची उपस्थिती झाली, तसेच स्थानिक बौध्दजन आणि महिला मंडळींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थितीनी धम्म प्रचारक आयु संदीप महाडिक यांनी निसर्ग आणि बुद्धधम्म यांचे महत्त्व समजावून सांगितले तसेच पर्यावरण जपण्याचे संदेश दिले. आर्थिक नियोजन विषयावर शेखर जाधव यांनी प्रभावी मार्गदर्शन केले, तर चंद्रमणी साळवी, बौध्दजन पंचायत समिती शाखा क्रमांक ८४१ चे अध्यक्ष, यांनी वृक्षारोपणाचा सामाजिक व धार्मिक स्तरावर महत्त्व स्पष्ट केले. महिला प्रतिनिधी सुप्रिया साळवी, पंचशिल बौध्दजन सेवा संघ, गोरेगाव विभागाच्या अध्यक्षा, यांनीही झाडांच्या संरक्षणाचे फायदे समजावून दिले व कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास निखिल लोखंडे यांनी सुत्रसंचालन केले. याशिवाय ज्येष्ठ मंडळींमध्ये तुकाराम लोखंडे, जयराम लोखंडे, विश्राम लोखंडे, अनंत लोखंडे, प्रविण, पांडुरंग, राजेश्री, लीलाबाई, भागन, अपर्णा, सुवर्णा, प्रफुल्ला, ऋतिका, सविता तसेच मुंबई कमिटी अध्यक्ष प्रमोद लोखंडे, संदेश, महेंद्र, विपुल, दिनेश, नितेश, विशाल, राजेश, राजेंद्र, संजय लोखंडे तसेच मांगरुळ बौध्दजन सेवा संघाचे सर्व सदस्य, नवतरुण



संघ, महिला मंडळ यांच्याही मोठ्या प्रमाणावर सहभागी झाल्यामुळे कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

या वृक्षारोपण उपक्रमातून स्थानिक समाजात पर्यावरण संवर्धनाची जाणीव वाढण्यास मदत झाली असून, निसर्गप्रेमी आणि धर्मीय दृष्टिकोनातूनही वृक्षांची काळजी घेण्याचे महत्त्व अधोरेखित झाले. वृक्षारोपण हा सामाजिक, धार्मिक आणि पर्यावरणीय जबाबदारीचा संदेश देणारा उपक्रम असल्याचे सर्वांनी मान्य केले.

# तळा तालुक्यातील शेतकरी वर्ग गुंतला लावणीच्या कामात

## तळा बाजारपेठेत नागरिकांअभावी शुकशुकाट

**तळा |** तळा तालुक्यातील शेतकरी वर्ग लावणीच्या कामात गुंतल्याने तळा बाजारपेठेत नागरिकांअभावी शुकशुकाट पसरल्याचे चित्र पहायला मिळत आहे. तळा तालुका हा दुर्गम व डोंगराळ भागात वसलेला असल्याने शेती हा येथील प्रमुख व्यवसाय आहे. उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नसल्याने येथील नागरिक शेती करूनच त्यातुन आपला उदरनिर्वाह भागवितात. शेतीतून मिळालेल्या उत्पन्नावरच येथील नागरिक आपल्याला लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तू बाजारपेठेतून खरेदी



करतात.परंतु गेल्या दोन ते तीन दिवसांपासून तळा बाजारपेठेत ग्राहकांअभावी शुकशुकाट पसरले आहे.तालुक्यातील बहुतांश शेतकरी वर्ग शेती लावणीच्या कामात व्यस्त असल्यामुळे बाजारपेठेत नागरिकांची वर्दळ कमी झाली असून जवळपास आणखी आठ ते दहा दिवस लावणी चालणार असल्याने बाजारपेठेत मंदीचे सावट पाहायला मिळत आहे. व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर आपल्या दुकानात माल भरला आहे.परंतु ग्राहकांअभावी मालाची विक्री होत नसल्याने व्यापारी वर्गात देखील चिंतेचे वातावरण पसरले आहे.

# वारकऱ्यांची आरोग्य तपासणी रोहा तालुका मेडिकल असोसिएशनचा स्तुत्य उपक्रम

**रोहा |** रोहा तालुका मेडिकल असोसिएशनतर्फे शनिवारी फलटण येथे पंढरपूर वारीतील वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात आळंदीहून संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीसोबत सुमारे १३० किमीचा पायी प्रवास करून आलेल्या भाविक वारकऱ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. दम लागणे, स्नायू दुखणे, थकवा, पायांमध्ये सूज अशा समस्या घेऊन आलेल्या वारकऱ्यांना तत्काळ उपचार व औषध वाटप करण्यात आले.

या शिबिराचे नेतृत्व आरटीएमएचे अध्यक्ष डॉ. मुकेश सिंग, डॉ. अमित पाटील (उपाध्यक्ष) आणि डॉ. प्रथमेश बुधे (सचिव) यांनी केले. यावेळी डॉ. रुपेश होडबे (खजिनदार), डॉ. संकेत म्हात्रे



(समन्वयक), डॉ. अभिजीत जोशी (सहसचिव) आणि डॉ. अतुल पाटील (सहखजिनदार) आणि इतर पदाधिकारी व सदस्यांनी यांनी आपली वैद्यकीय सेवा दिली.

तसेच आवश्यक औषधांचे वाटपही असोसिएशनतर्फे मोफत करण्यात आले. या उपक्रमाबद्दल एकनाथ तोडकरी, जय हनुमान भजनी मंडळ बामणी, तालुका व जिल्हा धाराशिव, वारकरी संप्रदाय यांच्यातर्फे सर्व डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला.

# दुबेवाडी रस्त्याची दयनीय अवस्था आता ग्रामस्थ आंदोलनाच्या पवित्र्यात

**सुधागड-पाली |** पाच्छापूर ग्रामपंचायत हद्दीतील पाच्छापूर व दुबेवाडी रस्ता सध्या अक्षरशः मृत्यूपंथावर आहे. रस्त्याची उखडलेली अवस्था, मोठमोठे दगड, खड्डे आणि चिखलाचे साम्राज्य – हे चित्र पाहून प्रशासनाच्या नाकर्तेपणाची प्रचिती येते. गेल्या अनेक दिवसांपासून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ग्रामस्थांनी धावपळ केली, निवेदनं दिली, तक्रारी दाखल केल्या, पण प्रत्यक्षात काहीच घडलं नाही. विद्यार्थ्यांचे शिक्षण, नागरिकांचे आरोग्य, महिलांचा सुरक्षित प्रवास सारे काही धोक्यात आहे.

आता ग्रामस्थांनी परिस्थिती हातात घेण्याचा



निर्णय घेतला आहे. ते आंदोलनाच्या पवित्र्यात आले असून लवकरात लवकर रस्त्याच्या दुरुस्तीच्या मागणीसाठी एकजूट दाखवत आहेत. हा केवळ प्रवासाचा प्रश्न नाही, तर ग्रामस्थांच्या हक्कांचा आणि जगण्याच्या अधिकाराचा लढा आहे.

जर प्रशासनाने आता देखील याकडे दुर्लक्ष केले, तर गावकऱ्यांचा संघर्ष रस्त्यावर उतरेल, असा ठाम निर्धार अनेकांनी व्यक्त केला आहे. हक्काची मागणी शांतपणे केली जात आहे, पण ती दुर्लक्षित राहिली तर तीव्र आंदोलन करावे लागेल अशी भावना ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे .

# न्यू इंग्लिश स्कूल वलंग विद्यालयाचे प्रयोगशाळा परिचर श्री चंद्रकांत मोरे यांचा सेवापूर्ती सोहळा व इयत्ता दहावी विद्यार्थी गुणगौरव उत्साहात संपन्न

**महाड |** वलंग शिक्षण प्रसारक मंडळाच्या न्यू इंग्लिश स्कूल वलंग विद्यालयातील प्रयोगशाळा परिचर मा.श्री चंद्रकांत सखाराम मोरे हे ३४ वर्ष ११ महिन्याच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३१ मे २०२५ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांचा सेवापुर्तीचा सोहळा २८ जून २०२५ रोजी विद्यालयात संस्थेचे अध्यक्ष मा.अनंत रेवाळे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली व रायगड जिल्हा परिषद सेवानिवृत्त वेतन पथक अधीक्षक मा.श्री सुभाष शिंदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी संस्था,विद्यालय,वसतिगृह व विद्यार्थी यांच्या वतीने त्यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, प्रतिमा, भेटवस्तू व पोशाख देऊन सपत्नीक गौरविण्यात आले. दिनांक ३१ मे रोजी सेवानिवृत्त झालेले मा.श्री सुभाष शिंदे साहेब यांचा देखील संस्था व शाळेच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला. मार्च २०२५ मध्ये इयत्ता दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा देखील आयोजित करण्यात आला होता. सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले व पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यालयाचे मुख्याध्यापक व संस्था कार्यवाह मा.श्री राजन कुर्डुनकर सर यांनी आपल्या प्रास्ताविकात श्री चंद्रकांत मोरे यांच्या कार्याचा गुणगौरव केला. शाळेचा सतत सहा वर्ष लागणारा शंभर टक्के निकाल




याबद्दल सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांचे कौतुक केले. संस्थेचे सहकार्य सतत लाभत असल्यामुळे संस्था पदाधिकाऱ्यांचे आभार मानले व इयत्ता दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. इयत्ता दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी कु.प्रिया जाधव व यश जाधव यांनी कृतज्ञतापूर्वक मनोगत व्यक्त केले. इयत्ता पाचवी ते दहावीच्या वर्गातील नव्या जाधव, रोनक चिविलकर, आयुष पोवळेकर,मोरे,युवराज चंदूरकर, मृणाली गोसावी या विद्यार्थ्यांनी श्री मोरे काका यांच्या विषयी भावस्पर्शी मनोगते व्यक्त केली. श्री मोरे यांनी आपल्या सत्काराला उत्तर देताना आपण खूप भावुक झालो आहोत. या शाळेने मला खूप दिले आहे. त्या ऋणात राहायला आवडेल, असे म्हणून सर्वांचे आभार मानले. तर श्री सुभाष शिंदे साहेब यांनी आपला खडतर प्रतिकूलतेवर मात करीत केलेला प्रवास कथन केला आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. संस्थेचे माजी कार्यवाह मा.श्री प्रभाकर सागवेकर साहेब यांनी संस्थेचा संपूर्ण इतिहास कथन करून संस्थापक कै.कुर्डूनकर गुरुजी आणि पहिले अध्यक्ष कै.ह भ प ल.पां.बर्वे यांच्या ऋणाविषयी उपस्थितांना जाणीव उपस्थितांना करून दिली. अध्यक्षीय भाषणात मा.श्री अनंत रेवाळे यांनी विद्यालयाची चाललेली शैक्षणिक,भौतिक प्रगतीचे कौतुक केले. श्री मोरे आणि श्री शिंदे यांना शुभेच्छा दिल्या.

# मुरुड महावितरण कडून काजू उत्पादकांवर अन्याय; हजारो रुपयांचे नुकसान

**मुरुड जंजिरा |** सध्या मुरुड तालुक्यात वारंवार वीज गायब होत असल्याने याचा सर्व नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. पावसाचे प्रमाण घटले असताना सुधा वीज मात्र वारंवार जात आहे. सातत्याने वीज गायब झाल्याने थंड पेय विक्रेते व दूध विक्रेते त्याच प्रमाणे काजू उत्पादकावर मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. दर मंगळवारी लोड शेडिंग विजेची कामे करण्यासाठी घेतले जाते मग तरी सुधा गायब होत असल्याने तालुक्यातील जनता त्रस्त झाली आहे.

वीज महावितरण यांच्या कडून मजगाव नांदगाव परिसरात दिवसातून पाच ते सहा वेळा चार ते पाच तासासाठी लाईट जात आहे यामुळे काजू उद्योग व्यवसायात रोज दोन ते तीन हजाराचा तोटा सहन करावा लागत आहे. महावितरण चे अधिकारी यांच्याकडे संपर्क साधला असता डायरेक्ट लाईन गेली आहे असे उत्तर देतात.नांदगाव केंद्रात 26 उपगावे असून सुमारे 25 हजार जनतेला विजेच्या अनिमितेला सामोरे जावे लागत आहे.मजगाव येथे प्रीतम पाटील यांचा काजू गर उत्पादनाचा व्यवसाय आहे. हजारो टन काजू बिया यांच्यावर वेग वेगळ्या प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी वीज खूप आवश्यक आहे.जर वीज नसेल तर सर्व कामे ठप्प पडतात.त्यामुळे उपलब्ध कामगार यांना फुकट पगार द्यावा लागत असल्याने काजू उत्पादन करते प्रीतम पाटील यांचे दिवसाला हजारो रुपयांच नुकसान होत आहे.वीज महावितरणला वारंवार सांगून सुधा



यामध्ये कोणताही फरक पडत नाही. त्यामुळे प्रीतम पाटील यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आह.

या बाबत अधिक माहिती सांगता प्रीतम पाटील यांनी सांगितले की, माझ्या काजू व्यवसायात 13 कामगार असून लाईट गेल्यामुळे कोणतेही काम होत नाही व कामगारांना रोजचा पगार द्यावा लागतो वीज वितरण विभागाच्या भोंगळ कारभारामुळे लाखो रुपयांचा नुकसान होत आहे.

# जनचक्र वर्धापन दिन सोहळा महात्मा गांधी वाचनालय सभागृह पेण येथे उत्साहात साजरा

**पेण |** प्रथम मुख्य संपादक यांनी गणरायाचा प्रतिमेचे पुष्पहार घालुन गणेश पूजन केले, नंतर मा. नगराध्यक्ष प्रितम ताई पाटील,अॅड. मंगेश नेने, संजय ठाकुर,यांनीदिपप्रज्वलन केले, संपादक दिनेश म्हात्रे यांनी मा. नगराध्यक्षा प्रितम ताई पाटील यांचे पुष्पगुच्छ,शाल व श्रीफळ देऊन सन्मानपूर्वक सत्कार केला, त्यानंतर संपादक यांनी प्रास्ताविक केले त्यांनी पत्रकारी क्षेत्रात वेळे प्रमाणे बदल घडवण्याचा आम्ही प्रयत्न करू आजच्या जनरेशन ला जलद व कमी वेळेत बातमी कशी पोहचेल याचा आम्ही प्रयत्न करु असे सांगुन मान्यवर व श्रोतेगण यांचे आभार व्यक्त केले.त्यांनतर सन्मानमुर्तीचा सन्मानचिन्ह, शाल श्रीफळ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला, त्यानंतर प्रितम ताई यांनी शब्दावलोकन करताना प्रामाणिक व निःस्वार्थ हेतु असेल तर परमेश्वर यश नक्कीच देतो, तसेच नागरिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत नक्की पोहचल्या पाहिजे, जनचक्र वृतपत्र साप्ताहिक, व जनचक्र न्युज चॅनेल चे वृतावोलोकन प्रामाणिक असल्याचा दाखला देऊन शुभेच्छा व कौतुक केले, अॅड. मंगेश नेने यांनी ही कौतुक करून अगदी जलद बातमी देणारे वृतलोकन आहे असे सांगितले, त्यानंतर संजयजी ठाकुर (महाराष्ट्र विद्युत मंडळ ), यांनी शब्दावलोकन करून कौतुक केले, त्यानंतर क्रमशा आई डे केअर च्या संस्थापिका, तसेच रोटरी क्लब ऑफ पेण च्या अध्यक्षा संयोगिता टेमघरे यांनी जनचक्र ने माझ्या कर्तृत्वाची प्रामाणिक दखल घेतली असुन माझ्या आयुष्यातील हा पुरस्कार आयुष्भर लक्षात राहील असे, सांगितले त्यानंतर कलाकार, अँकर आदिती पाटील, व शालेय विद्यार्थी कु.नियती प्रवीण म्हात्रे, यांचा जनचक्र सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला, वासुदेव पाटील यांनी ही जनचक्र साप्तहिक चे कौतुक केले त्यानंतर मुख्य संपादक दिनेश म्हात्रे व उप संपादक सचिन राजे शिर्के यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानुन, व सर्व पाहुण्यांना अल्प



उपहार देऊन कार्यक्रमांची सांगता केली या कार्यक्रमात, पत्रकार सुनील पाटील, समीर घायतले, संतोष पाटील (हमारापूर)निशिगंधा चॅरिटेबल ट्रस्टच्या संस्थापिका निशिगंधाताई गुंड, शिवसेनेच्या नेत्या दीपाश्रीताई पोटफोडे, कोळी महासंघ संघटनेच्या कोकण विभाग अध्यक्षा अनुजा ताई पाटील, कामगार संघटनेचे वासुदेव पाटील, विजय पाटील, समाज सेवक अनिल दरेकर, जनचक्र चे सहकारी भरत साळवी,महेंद्र मोहिते, गिरीश शहा, मुकुंद टेमघरे, अशोक जैन,बल्लाळ ढवळे,महेश पाटील, डॉ मनोज जोशी, अॅड. डॉक्टर नीता कदम,अंकिता पोटे, वर्षा पाटील, नेहा म्हात्रे, ममता म्हात्रे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. निवृत्त मुख्याध्यापक शेखर पुंडे सर यांनी सुरेख निवेदन करून कार्यक्रमाला योग्य दिशा दिली.

# पनवेल शहर पोलिसांनी लाखो रुपये किंमतीचे हेरॉईन केले हस्तगत

**पनवेल |** पनवेल शहर पोलिसांनी कर्नाळा स्पोर्टस अॅकॅडमी ते टी पॉईंटकडे जाणाऱ्या रोडवरील ब्रीजजवळ सापळा रचून दोघा इसमांना ताब्यात घेतले असता त्यांच्याकडून जवळपास 1 लाख 5 हजार रुपये किंमतीचे हेरॉईन हा अंमली पदार्थ हस्तगत केला आहे.

पंजाब येथून सतनाम सिंग सुखदेव सिंग (31) व सुखविंदर सिंग मुकनार सिंग (59) हे दोघे जण बेकायदेशीररित्या अंमली पदार्थ घेवून येणार असल्याची माहिती वपोनि नितीन ठाकरे यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि.अभिजीत अभंग, पोउपनि हजरत पठाण, पो.ना.प्रवीण मेथे, पो.ना.रवींद्र पारधी, पो.शि.साईन मोकळ, पो.शि.शशिकांत काकडे आदींच्या पथकाने सदर ठिकाणी सापळा रचून या दोघांना ताब्यात घेतले असता त्यांच्याकडे 35 ग्रॅम वजनाचा हेरॉईन हा अंमली पदार्थ आढळून आला. सदर अंमली पदार्थ कोणास देण्यासाठी आणला होता याबाबत पुढील तपास पोउपनि हजरत पठाण करीत आहेत.

# हेल्मेटने मारहाण करून केले जखमी

**नवीन पनवेल |** हेल्मेटने आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी रमण तोरसकर, रोहित सावंत, देवेंद्र गरुडे यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात 28 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

अमित सावंत हे विचुंबे येथे राहत असून त्यांनी रमण तोरसकर याला फ्लॅट घेण्यासाठी 18 लाख रुपये दिले. मात्र चांगला फ्लॅट न दाखवल्यामुळे त्याच्याकडे दिलेले पैसे परत मागितले. त्याने नऊ लाख रुपये परत दिले. उर्वरित रक्कम देण्यास टाळाटाळ करत होता. रमण तोरस्कर कडे नऊ लाख रुपये परत मागितले असता खांदा कॉलनी येथे बोलावले आणि तुझे पैसे देणार नाही असे बोलून शिवीगाळ केली. यावेळी शिवीगाळ का करतो असे विचारले असता रमण व त्याचा मित्र रोहित सावंत आणि देवेंद्र गरुडे यांनी लाथाबुकयांनी मारहाण केली तर रोहित सावंत यांनी हेल्मेटने डोक्यात मारून जखमी केले.

# शिवसेना पनवेल शहर प्रभाग क्र 19 तर्फे दगडी शाळा येथे मोफत छत्री वाटप व वृक्षारोपण

## शिवसैनिक राहुल केशव गोगटे यांच्या पुढाकाराने कार्यक्रम संपन्न

**पनवेल |** शिवसेना पनवेल शहर प्रभाग क्र १९ च्या वतीने पनवेल महानगरपालिका शाळा क्र २ दगडी शाळा येथे शिवसेना वर्धापनदिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना मोफत छत्री वाटप करण्यात आले तसेच या निमित्ताने शाळेत वृक्षारोपण देखील करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे व महानगरप्रमुख प्रथमेश सोमण यांनी आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी त्यांनी सांगितले की शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या उक्ती नुसार ऐंशी टक्के समाजकारण व वीस टक्के राजकारण तसेच पक्षप्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनुसार आम्ही राजकीय क्षेत्रात नागरिकांच्या समस्या सोडविण्याचा प्रामाणिक



प्रयत्न करत असून त्याचाच हा एक भाग आहे. त्यानुसार शिवसैनिक राहुल गोगटे यांच्या प्रयत्नातून शाळेतील विद्यार्थ्यांना छत्री वाटप आणि पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून शाळेत वृक्षारोपण करण्यात आले आहे.

यावेळी जिल्हा सल्लागार – रमेश गुडेकर, जिल्हाप्रमुख - रामदास शेवाळे , महानगरप्रमुख - प्रथमेश सोमण, उपजिल्हाप्रमुख - परेश पाटील, उपमहानगर प्रमुख – महेश सावंत, शहरप्रमुख - प्रसाद सोनावणे ,उपशहरप्रमुख - शैलेश जगनाडे, सुजन मुसलोंडकर, विक्रम पाटणकर, मंदार काणे,आदी शिवसैनिक उपस्थित होते, तसेच पनवेल दगडी शाळेचे मुख्याध्यापक सुजित म्हात्रे, शिक्षक कमल तायडे ,वैभव पाटील,वैशाली सावळे, अर्चना माने, स्वाती पाटील यांनी शिवसेनेच्या या उपक्रमाबाबत आभार मानले. सदर छत्री वाटप व वृक्षारोपण कार्यक्रम शिवसैनिक राहुल गोगटे यांच्या पुढाकाराने संपन्न झाला.

महासागर



# संपला म्हणालात, पण आता युतीसाठीच विनवण्या
## शिंदेंचा उद्धव ठाकरेंना सणसणीत टोला

मुंबई, दि. ३० प्रतिनिधी

"राज ठाकरेंच्या मनसेला 'संपलेला पक्ष' म्हणून हिणवणारे उद्धव ठाकरे आता त्यांच्यासोबत युतीसाठीच विनवण्या करत आहेत," अशा खरमरीत शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर थेट तोफ डागली.

नाशिकमधील ठाकरे गटाचे माजी महानगरप्रमुख विलास शिंदे, सात नगरसेवक, सरपंच, उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांनी शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर शिंदे नाशिकमध्ये बोलत होते.

"आज काही जण 'कम ऑन किल मी' म्हणतात, पण त्यांची अवस्था 'शोले'मधील असरानीसारखी झाली आहे. दररोजची गळती थांबत नाही, म्हणूनच आता ज्यांना 'संपलेला पक्ष' म्हणायचे, त्यांच्यासोबत युतीसाठी विनवण्या कराव्या लागत आहेत," असा घणाघात शिंदेंनी केला.

शिंदेंनी ठाकरेंना इशारा देताना म्हटले, "आज विलास शिंदेंचा प्रवेश होताच, सकाळी ठाकरेंच्या लोकांनी विचारलं – 'कोण विलास शिंदे?' पण अयोध्येला जाताना, निवडणुकीला कामाला मात्र हेच शिंदे लागायचे. अशीच अहंमन्यता राहिली, तर लवकरच लोक तुम्हाला 'तुम्ही कोण?' विचारतील."

विलास शिंदे यांच्यासोबत नाशिकमधील माजी नगरसेवक संतोष गायकवाड, नयना गांगुर्डे, विष्णूपंत बेंडकुळे, प्रवीण पाळदे, पल्लवी पाटील, निलेश ठाकरे, उषाताई शेळके यांचा तसेच उपमहानगरप्रमुख निवृत्ती इंगोले, जिल्हा परिषद सदस्य सोमनाथ फडोळ, राष्ट्रवादीचे मोहनीश दोंदे, युवासेनेचे सुनील मते, सभापती खंडू भोये, सरपंच रमेश भोये यांचा शिवसेनेत प्रवेश झाला.

या पक्षप्रवेश कार्यक्रमाला शिक्षणमंत्री दादाजी भुसे, खासदार नरेश म्हस्के, सचिव राम रेपाळे, भाऊसाहेब चौधरी, हेमंत गोडसे यांच्यासह शिवसेनेचे सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रवेशामुळे नाशिक महापालिकेत शिवसेनेचा भगवा पुन्हा फडकणार, असा विश्वास उपमुख्यमंत्री शिंदेंनी व्यक्त केला.

# अन्न सुरक्षा हा सार्वजनिक आरोग्याचा पाया - जी. कमलावर्धन राव

मुंबई, दि. ३० प्रतिनिधी




अन्न सुरक्षा हा सार्वजनिक आरोग्याचा पाया असून यामध्ये कोणतीही कसूर होऊ नये यासाठी अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी कटाक्षाने व समन्वयपूर्वक काम करावे असे निर्देश अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (FSSAI) चे मुख्य कार्यकारी अधिकारी जी. कमलावर्धन राव यांनी दिले.

अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (FSSAI) चे मुख्य कार्यकारी अधिकारी जी. कमलावर्धन राव यांनी राज्यातील अन्न सुरक्षा अंमलबजावणीचा नुकताच सविस्तर आढावा घेतला. ही आढावा बैठक FSSAI च्या प्रशिक्षण व क्षमता विकास संस्थेतील इन्स्टिट्यूट ऑफ ट्रेनिंग ऑफ कंझ्युमर फूड सेफ्टी अँड अप्लाइड न्यूट्रिशन (ITCFSAN) येथे झाली. बैठकीस अन्न सुरक्षा आयुक्त राजेश नार्वेकर, ठाणे व कोकण विभागातील सह आयुक्त (अन्न), परवाना प्राधिकारी, न्यायनिर्णय अधिकारी, तसेच पश्चिम विभागीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण संचालक प्रीती चौधरी यांच्यासह केंद्र व राज्य सरकारच्या विविध यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

अन्न सुरक्षेच्या उच्चतम मानकांचे पालन हे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अत्यावश्यक असल्याचे सांगून पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर (PDW) युनिट्सची १०० टक्के तपासणी सुनिश्चित करण्याचे श्री. राव सांगितले. तसेच सहा महिन्यांतून एकदा PDW युनिट्सच्या अनुपालन तपासणीस भर द्यावा, असेही ते म्हणाले.

अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणच्या 'ईट राईट इंडिया' उपक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्यात अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत राबवण्यात आलेल्या रस्त्यावरच्या खाद्य विक्रेत्यांच्या तपासणी मोहिमांचे श्री. राव यांनी यावेळी विशेष कौतुक करून अंगणवाडी सेविका व स्ट्रीट फूड विक्रेत्यांसाठी घेण्यात आलेल्या FoSTaC प्रशिक्षणाच्या माध्यमातून अन्न सुरक्षेच्या जनजागृतीचे अनुकरणीय उदाहरण महाराष्ट्राने निर्माण केल्याचे त्यांनी सांगितले. या मॉडेलचा देशपातळीवर प्रसार करण्याचा मानस असल्याचेही ते म्हणाले.

अन्न सुरक्षा चाचणीसाठी नवीन मोबाईल फूड टेस्टिंग वाहन तत्काळ कार्यान्वित करावीत, असे सांगून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'तेल वापरात १० टक्के कपात' या आवाहनाची प्रभावी अंमलबजावणी महाराष्ट्रातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचवावी, असे आवाहन श्री. राव यांनी यावेळी केले.

# अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकडून 'राष्ट्रीय सांख्यिकी दिन' साजरा

मुंबई, दि. ३० प्रतिनिधी




स्वातंत्र्योत्तर काळात देशाचे आर्थिक नियोजन व सांख्यिकीय पध्दतीचा विकास यामध्ये विख्यात सांख्यिकी शास्त्रज्ञ प्रा. प्रशांत चंद्र महालनोबीस यांच्या महत्वपूर्ण योगदानाबद्दल त्यांचा जन्मदिन २९ जून हा सांख्यिकी दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत यशवंतराव चव्हाण केंद्र, मुंबई येथे १९वा राष्ट्रीय सांख्यिकी दिन साजरा करण्यात आला. 'राष्ट्रीय नमुना पाहणीची ७५ वर्षे' ही या राष्ट्रीय सांख्यिकी दिनाची मध्यवर्ती संकल्पना होती.विश्वविख्यात थोर सांख्यिकी तज्ञ व भारताच्या आधुनिक सांख्यिकीचे जनक डॉ. प्रशांत चंद्र महालनोबिस यांचा जन्मदिन २९ जून हा दिवस सन २००७ पासून दरवर्षी संपूर्ण देशभर 'राष्ट्रीय सांख्यिकी दिन' म्हणून साजरा केला जातो. राज्य शासनाची प्रमुख सांख्यिकी संस्था असलेल्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयाद्वारे यशवंतराव चव्हाण केंद्रात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आयुक्त डॉ. ज्योत्स्ना पडियार, मुंबई आयआयटीचे प्रा. सतिश अग्नीहोत्री, भारतीय सांख्यिकी सेवेचे सेवानिवृत्त अतिरिक्त महासंचालक अशोक कुमार टोपरानी, नियोजन विभागाचे सह सचिव विवेक गायकवाड, अर्थ व सांख्यिकी संचालक कृष्णा फिरके, शशिकांत मुळे तसेच नियोजन विभाग, अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील अधिकारी/कर्मचारी, नियोजन क्षेत्राशी निगडित संशोधक आदी उपस्थित होते. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आयुक्त डॉ. ज्योत्स्ना पडियार यांनी संचालनालयातील अधिकारी व कर्मचारी करीत असलेले सांख्यिकीचे काम हे राज्याला धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी फारच उपयुक्त असल्याचे नमूद केले. देशात प्रथम महाराष्ट्रात सबस्टेट लेव्हलवर ग्राहक किंमती निर्देशांक परिगणित करण्यात येणार आहे संचालनालयामार्फत प्रकाशित होणारे विविध अहवाल केंद्र शासनाच्या टाईमलाईन बरोबर प्रकाशित करण्यात येत असल्याचे नमूद केले. तसेच पुढील कालावधीत राज्य व्यवसाय नोंदवही तयार करणे व माहितीचे आदान प्रदान ऑनलाईन पद्धतीने करण्याबाबत प्रणाली विकसित करण्यात येत असल्याचे सांगितले. सांख्यिकीय माहिती प्राप्त झाल्यानंतर माहितीचे विश्लेषण व धोरणकर्त्यांना तत्काळ आकलन होईल अशा स्वरूपाचे व्हिजुअल सादरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. त्याचप्रमाणे माहितीच्या आधारे शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेणाऱ्याशी संवाद असणे आवश्यक असल्याचे मत प्रा. अग्नीहोत्री यांनी व्यक्त केले.

# म्हाडा पोलिस वसाहतीत स्लॅब कोसळला

मुंबई, दि. ३० प्रतिनिधी

जोगेश्वरी पूर्व येथील म्हाडा पोलिस वसाहतीतील अ-५ बिल्डिंगमधील दुसऱ्या मजल्यावरील रूम क्रमांक ३०३ मध्ये स्लॅब कोसळल्याची घटना घडली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. सदर घटनेची माहिती मिळताच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी स्थानिक प्रतिनिधींची उपस्थिती होती. अधिकाऱ्यांनी तत्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश दिले असून, इमारतीच्या संरचनात्मक सुरक्षिततेचा आढावा घेतला जात आहे. या प्रकारामुळे रहिवाशांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं आहे.



**शक्ती एसआरए सोसायटी, भाबरेकर नगर, कांदिवली (पश्चिम) येथे आकाशवाणीवरील "मन की बात" या पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आमदार श्री योगेश सागर आणि जिल्हाध्यक्ष दीपक बाळा तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी नगरसेवक कमलेश यादव, राकेश कुमार यादव, योगेश पडवळ, संजय सिंह, सुलभा जोशी, प्रमोद गुजर, मनीष साळुंखे, राजेश मिस्त्री, रमाशंकर यादव, राजेश यादव, अजय यादव, नीरज यादव (ॲडव्होकेट, उच्च न्यायालय), पुरुषोत्तम चौबे, संतोष शुक्ला तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# पाच लाख बहिणी वेटिंगवर
## वर्षभरानंतरही आधार कार्ड-बँक जोडणी नाहीच

मुंबई, दि. ३० प्रतिनिधी

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेंतर्गत महिना १,५०० रुपये मिळतील या आशेने राज्यातील २ कोटी ६२ लाख महिलांनी अर्ज केला. यापैकी ९ लाखांहून अधिक महिला विविध कारणांमुळे अपात्र ठरल्या. त्यामुळे दोन कोटी ५२ लाख पात्र महिलांना महिना १,५०० रुपये लाभ मिळणे अपेक्षित असताना २ कोटी ४७ लाख पात्र महिलांच्या बँक खात्यात पैसे जमा होत आहेत. मात्र जुलै २०२४ मध्ये अर्ज करूनही आधार कार्ड बँकेशी लिंक होत नसल्याने ५ लाख लाडक्या बहिणींना महिना १,५०० रुपये मिळण्यासाठी वेटिंगवरच आहेच. दरम्यान, या विषयी विचारणा करण्यासाठी महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांना फोनवर संपर्क साधला असता त्या उपलब्ध झाल्या नाहीत.

विधानसभा निवडणुकीपूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची घोषणा केली. योजनेची घोषणा होताच २ कोटी ६२ लाख महिलांनी अर्ज केले. विशेष म्हणजे योजनेची घोषणा झाली महिलांनी अर्ज केले आणि तातडीने अंमलबजावणी करत महिलांच्या बँक खात्यात महिना १५०० रुपये जमा होण्यास सुरुवात झाली. योजनेचा लाभ पात्र महिलांना मिळू लागला आणि ऐन निवडणुकीच्या आधी महायुती सरकारने निवडणुकीत विजय झाला तर १५०० रुपयांऐवजी २१०० रुपये देऊ असे जाहीर केले. महायुतीच्या घोषणेनंतर विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना महायुतीसाठी गेमचेंजर ठरली आणि महायुतीची सत्ता राज्यात आली. मात्र राज्याच्या तिजोरीत खडखडाट पात्र महिलांना पैसे देण्यासाठी आणायचे कुठून असा प्रश्न महायुतीला सतावू लागला आणि हळुवार अर्जाची छाननी प्रक्रिया राबत आतापर्यंत १० लाख महिला अपात्र ठरल्या आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत २ कोटी ५२ लाख महिला पैकी २ कोटी ४७ लाख पात्र महिलांच्या बँक खात्यात पैसे जमा केले जात आहेत. मात्र उर्वरित पाच लाख लाडक्या बहिणींचे आधार कार्ड बँकेशी लिंकच होत नसल्याने त्या वेटिंगवरच आहेत. दरम्यान, जुलै २०२४ मध्ये योजनेची घोषणा केली त्यावेळी या योजनेसाठी वर्षाला ४५ हजार कोटींची तरतूद करण्यात आली होती. मात्र राज्याच्या तिजोरीत खडखडाट असल्याने पैशांची जमवाजमव करण्यात महायुतीच्या नेत्यांची दमछाक झाली आहे.

# मुंबईतील धार्मिक स्थळे 'लाऊडस्पीकरमुक्त' -पोलीस आयुक्त

मुंबई, दि. ३० प्रतिनिधी

शहरातील सर्व धार्मिक स्थळांवरून दिशा-नियंत्रित लाऊडस्पीकर्स हटवण्यात आले असून आता मुंबई ही 'लाऊडस्पीकरमुक्त' झाली आहे, असे मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी एका वृत्तसंस्थेशी बोलताना स्पष्ट केले.

विशिष्ट समुदायाला लक्ष्य केल्याचे आरोप फेटाळून लावत, पोलीस आयुक्तांनी सांगितले की, ही कारवाई कोणत्याही एका समुदायाविरुद्ध नव्हती. या कारवाईपूर्वी आम्ही समाजिक व धार्मिक नेते तसेच राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशी चर्चा करून त्यांची सहमती मिळवली. यावरून ही कारवाई सहकार्याच्या आधारे राबवण्यात आली हे स्पष्ट होते, असे भारती म्हणाले. ही कारवाई जानेवारी २०२५ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर करण्यात आली.

शहरभरातील सुमारे १,५०० लाऊडस्पीकर्स आम्ही हटवले आहेत. यापुढे अशा लाऊडस्पीकर्सची पुन्हा उभारणी होणार नाही, याचीही पोलीस खात्याने दक्षता घेतली आहे. कायमस्वरूपी लाऊडस्पीकर्सवर बंदी लागू झाली असली, तरी धार्मिक सण-उत्सवांच्या वेळी परवानग्या दिल्या जातील, असेही भारती यांनी स्पष्ट केले.

# मुंबई ग्राहक पंचायत मध्यस्थ उपलब्ध करून देणार

मुंबई, दि. ३० प्रतिनिधी

देशात साडेचार कोटींहून अधिक प्रलंबित दाव्यांची गंभीर दखल घेत सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी 'मेडिएशन फॉर द नेशन' ही मध्यस्थीद्वारे तंटा निवारणाची विशेष मोहीम जाहीर केली आहे. मुंबई ग्राहक पंचायतीने सरन्यायाधीश न्या. गवई यांच्या मध्यस्थीद्वारे तंटा निवारणासाठी घेतलेल्या पुढाकाराचे मुंबई ग्राहक पंचायतीने स्वागत केले आहे.

ग्राहक न्यायालयातील प्रलंबित दाव्यांमध्ये मध्यस्थीद्वारे तक्रार निवारणासाठी मुंबई ग्राहक पंचायतीचे दहा प्रशिक्षित मध्यस्थ तसेच जागा आणि अन्य सुविधा उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शवली आहे.

मुंबई ग्राहक पंचायतीचे कार्याध्यक्ष शिरीष देशपांडे यांनी याबाबत राज्य ग्राहक आयोगाच्या अध्यक्षांना याबाबत पत्र लिहिले आहे. १ जुलै ते ३१ जुलै या दरम्यान कौटुंबिक न्यायालयांतील तंटे, मोटर अपघात तंटे, ग्राहक न्यायालयातील तंटे, धनादेश नाकारण्याचे आणि कर्ज वसुलीचे तंटे असे अनेक प्रलंबित तंटे, ज्यात मध्यस्थीने तंटा निवारण होण्याची शक्यता आहे त्याची संबंधित न्यायालयांतर्फे निवड केली जाईल, त्या तोट्यातील पक्षकारांना त्यानुसार कळवण्यात येईल आणि या तंट्यांत मध्यस्थीने तंटा निवारणासाठी मध्यस्थाची नेमणूकही केली जाईल. सप्टेंबर अखेरपर्यंत या तंट्यांत मध्यस्थीने निवारण करण्याचे या विशेष योजने अंतर्गत अपेक्षित आहे.

# 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते' अंतर्गत 235 मुलांची सुटका

मुंबई, दि. ३० प्रतिनिधी

मध्य रेल्वेच्या रेल्वे सुरक्षा बलाने (आरपीएफ) गेल्या दोन महिन्यांत ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत तब्बल २३५ हरवलेल्या मुलांना त्यांच्या कुटुंबाकडे परत पाठवले आहे. यामध्ये मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागात सर्वाधिक ६२ मुलांची सुटका करण्यात आली आहे.


रेल्वेच्या आरपीएफकडे रेल्वे मालमत्ता, प्रवासी क्षेत्र आणि प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत मुलांना वाचवण्याची जबाबदारी आरपीएफ पार पाडत आहे. एप्रिल ते मे या कालावधीत मध्य रेल्वेच्या आरपीएफने रेल्वे पोलीस (जीआरपी) आणि चाइल्डलाइन स्वयंसेवी संस्थेच्या समन्वयाने २३५ मुलांना त्यांच्या कुटुंबाच्या स्वाधीन केले.

मुंबई विभागातून ५३ मुलांना वाचविण्यात आले. भुसावळ विभागात ६२ मुलांची सुटका करण्यात आली. यामध्ये पुणे विभागात ५१, नागपूर विभागात ६१ मुलांची सुटका केली.

# सिद्धिविनायक मंदिराचे सुशोभिकरण
## मुंबई महानगरपालिका करणार तब्बल 500 कोटी रुपये खर्च

मुंबई, दि. ३० प्रतिनिधी

दादर (प.), प्रभादेवी येथील प्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिराचे सुशोभिकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिका ५०० कोटी रुपये खर्च करणार आहे. तीन टप्प्यात सदर काम पूर्ण करण्याचे आणि श्रेणी वाढ करण्याचे नियोजन आहे. मात्र पहिल्या टप्प्याच्या कामासाठी १०० कोटी रुपये खर्च होईल. निविदा प्रक्रियेला महापालिकेने सुरुवात केली.



गेल्यावर्षी ६ ऑगस्ट २०२४ रोजी मुख्यमंत्री पदावर असताना एकनाथ शिंदे यांनी सह्याद्री अतिथिगृह येथे सिद्धिविनायक मंदिराचे सुशोभीकरण कामाबाबत बैठक बोलावली होती.

त्यावेळी, तत्कालीन त्यांनी श्री सिद्धीविनायक मंदिरात येणाऱ्या भाविकांना उत्कृष्ट दर्जाच्या सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी सुशोभिकरणाच्या कामाला गती द्यावी. सदर कामासाठी नियोजन करण्याचे निर्देश महापालिका प्रशासनाला दिले होते. सिद्धीविनायक मंदिर सुशोभिकरण कामासाठी महापालिका तिजोरीमधून पाचशे कोटींचा खर्च करण्यात येणार आहे.

# प्रशासकीय प्राधिकरणाच्या कार्यकक्षा पालिकेस लागू करा- म्युनिसिपल इंजिनिअर्स असोसिएशनची मागणी

मुंबई, दि. ३० प्रतिनिधी

भारतीय संसदेने मुंबई महापालिकेमध्ये सुमारे ९२ हजार सार्वजनिक सेवेमध्ये नियुक्त असणाऱ्या कर्मचारी कार्यरत आहेत. इतक्या मोठ्या कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक गाऱ्हाणी संख्येच्या कर्मचाऱ्यांना आपले सेवाविषयक सोडविण्यासाठी प्रशासकीय प्राधिकरण गाऱ्हाणे मांडण्यासाठी मा. उच्च अन्वये महाराष्ट्र राज्य प्रशासकीय न्यायालयाचा दरवाजा ठोठावा लागतो. प्राधिकरण स्थापन करण्यात आलेले आहे. त्यामुळे कर्मचारी तसेच म.न.पा. या अधिनियमाच्या कलम १५/३/ (सी) प्रशासनाचा वेळ व सार्वजनिक पैसा खर्च अन्वये सदर प्राधिकरणाच्या कार्यकक्षा होतो. आजच्या घडीला मुंबई महापालिका व स्थानिक स्वराज्य महापालिकेतील हजारो असे सेवाविषयक संस्थेमधील सेवाविषयक गाहाण्यांसाठी दावे मा.उच्च न्यायालय व विविध लागू करण्याची तरतूद आहे. सदर न्यायालयात प्रलंबित आहेत, असे नमूद अधिनियमामधील कलम १५ (२) अन्वये करून महाराष्ट्र प्रशासकिय प्राधिकरणाच्या महाराष्ट्र शासनाने सदर तरतुदी लागू अधिकार कक्षा वाढवून त्यामध्ये करण्यासाठी अधिसूचना राज्यपत्रामध्ये महाराष्ट्रातील मुंबई महापालिकासह, सर्व प्रसिध्द करणे आवश्यक आहे. अशी महापालिका, नगरपालिका व स्थानिक मागणी म्युनिसिपल इंजिनिअर्स स्वराज्य संस्था यांचा अंतर्भाव करण्यात असोसिएशन, मुंबईने मुख्यमंत्री देवेंद्र यावा व या बाबतची कार्यवाही करण्यासाठी फडणवीस यांच्याकडे केली आहे.

## महत्त्वाच्या बातम्या

### साखळी खेचण्याच्या घटनांत ५३ टक्क्यांनी वाढ

मुंबई, दि. ३० प्रतिनिधी

मध्य रेल्वे मार्गावरील उपनगरी, मेल/एक्स्प्रेस गाड्यांमध्ये आपत्कालीन परिस्थितीसाठी असलेली साखळी खेचण्याच्या प्रकारांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. १ ते १९ जून या कलावधीत मध्य रेल्वे मार्गावरील १५० गाड्यांची साखळी खेचल्याचे प्रकार घडले. यामुळे गाड्यांचे वेळापत्रक बिघडू लागले आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा या घटनांमध्ये तब्बल ५३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. उपनगरीय आणि मेल/एक्स्प्रेस गाड्यांमध्ये आपत्कालीन परिस्थिती उद्धवल्यास याची सूचना मोटरमनपर्यंत पोचविण्यासाठी आणि गाडी थांबविण्यासाठी साखळी उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र या सुविधेचा गैरवापर होऊ लागला आहे. प्रवासी अनेक वेळा चुकीच्या व विविध कारणांसाठी साखळी खेचत आहेत. आहेत. चुकीच्या कारणांसाठी साखळी खेचल्यास प्रवाशांवर कारवाई करण्यात येते. मात्र याचा फटका केवळ संबंधित गाडीत प्रवास करणाऱ्या प्रवाशांसोबतच इतर गाड्यांनाही बसत आहे.

### मेट्रो गाड्यांसाठी ७ हजार कोटींचे कंत्राट

मुंबई, दि. ३० प्रतिनिधी

मेट्रो ४, मेट्रो ४ अ आणि मेट्रो ६ या मार्गिकांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे (एमएमआरडीए) ५७गाड्यांची खरेदी केली जाणार आहे. यासाठी दोन कंपन्यांना एकूण ७ हजार ५७ कोटीचे कंत्राट देण्यात आले आहे. वडाळा-ठाणे-कासारवडवली मेट्रो ४, कासारवडवली- गायमुख मेट्रो ४ अ या मार्गिकांसाठी ३९ गाड्या खरेदीचे ४ हजार ७८८ कोटींचे कंत्राट एल ॲण्ड टी कंपनीला देण्यात आले आहे. मेट्रो ६साठी १८ गाड्या खरेदी करण्याचे २,२६९ कोटींचे कंत्राट एनसीसी कंपनीला देण्यात आले आहे. मेट्रो ४ आणि ४ अ मार्गिकवरील कॅडबरी जंक्शन ते गायमुख हा १०.५ किमीचा टप्पा वर्षअखेरीस सुरू करण्याचे नियोजन आहे. याची चाचणी ऑगस्टमध्ये घेतली जाणार आहे. मेट्रो ६चे कामही वेगाने सुरू आहे. या दोन्ही मार्गिकांसाठी गाड्या खरेदी करण्याच्या प्रस्तावाला कार्यकारी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. मेट्रो ४ व ४ अ मार्गिकांसाठी ३९ गाड्या खरेदी करण्याचे कंत्राट बॉम्बार्डियर कंपनीला २०२१ साली देण्यात आले होते. मात्र कारशेडचा वाद सुरू असल्याने मार्गिकेला विलंब होणार असल्याचे कारण देत कंपनीने करार रद्द केला. त्यामुळे पुन्हा निविदा काढण्यात आली. यानुसार एल ॲण्ड टी कंपनीला हे कंत्राट देण्यात आले. मेट्रो ६ मार्गिकेच्या गाड्यांसाठी जानेवारी २०२४ मध्ये निविदा काढण्यात आली होती. प्रतिसाद मिळत नसल्याने अनेकवेळा मुदतवाढ देण्यात आली. अखेर एनसीसी कंपनीला हे कंत्राट देण्यात आले आहे.

### एमएमआरसीएलचे उत्पन्न वाढणार

मुंबई, दि. ३० प्रतिनिधी

मेट्रो ३ भुयारी मार्गिकेच्या स्थानकांतील जागेचा व्यावसायिक वापर करण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमआरसीएल) आणि इंडिया रिटेल ॲण्ड हॉस्पिटॅलिटी प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात नुकताच एक सामंजस्य करार करण्यात आला. यामुळे भुयारी मेट्रोच्या बीकेसी आणि विमानतळ टी २ या स्थानकांवर विविध सुविधा उपलब्ध होणार आहेत. मेट्रो १, मेट्रो २ अ आणि मेट्रो ७ या मार्गिकांच्या स्थानकांवरील काही जागांबर दुकाने उभारण्यात आली आहेत. यातून संबंधित मेट्रो मार्गिकांना उत्पन्न मिळते. बीकेसी आणि विमानतळ टी २ स्थानकांवरही विविध वस्तू आणि खाद्यपदार्थांची दुकाने तसेच एटीएम, इत्यादी सुविधा प्रवाशांना उपलब्ध होतील. एमएमआरसीएलतर्फे ३३.५ किमी भुयारी मेट्रो मार्गिका उभारली जात आहे. यातील आरे ते बीकेसी हा पहिला टप्पा ऑक्टोबर २०२४ मध्ये, तर बीकेसी ते आचार्य अत्रे चौक हा दुसरा टप्पा मे २०२५मध्ये सुरू झाला. सध्या या मार्गिकवर रोज ४० ते ५० हजार प्रवासी प्रवास करतात. प्रवाशांना खाद्यपदार्थ आणि एटीएम सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे. २७मेट्रो स्थानकांतील एकूण १.३ लाख चौरस फूट जागेचा व्यावसायिक वापर केला जाणार आहे.

### एसएनडीटी महिला विद्यापीठाला नॅककडून 'ए प्लस' मानांकन

मुंबई, दि. ३० प्रतिनिधी

चर्चगेट येथील श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाने (एसएनडीटी) राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेच्या (नॅक) कडून ए प्लस ग्रेड सह ३.२७असा लक्षणीय सीजीपीए मिळवून उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात गौरवशाली यश संपादन केले आहे. नॅककडून हे मानांकन विद्यापीठाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण, सर्वसमावेशक शिक्षणपद्धती आणि सतत शैक्षणिक प्रगतीच्या वचनबद्धतेचे प्रतीक म्हणून मिळाले आहे. विद्यापीठाच्या अध्यापन, संशोधन, नवोपक्रम आणि समाजाभिमुख कार्य यामध्ये सातत्याने केलेल्या उल्लेखनीय प्रगतीचा गौरव केला आहे. विद्यापीठाच्या वाटचालीला मिळालेले हे 'ए प्लस' मानांकन म्हणजे गुणवत्तेची नवीन उंची गाठण्याचे प्रतीक आहे. हे यश आमच्या संपूर्ण शिक्षकवर्ग, कर्मचारी आणि विद्यार्थीनींच्या अथक प्रयत्नांचे, संघभावनेचे व निष्ठेचे फलित आहे. विद्यापीठाच्या आगामी वाटचालीत या मानांकनामुळे दर्जात्मक सुधारणा, संशोधन आदी उपक्रमांना अधिक चालना मिळणार आहे. असे कुलगुरु प्रा. उज्ज्वला चक्रदेव यांनी यानंतर प्रतिक्रिया देताना सांगितले. या यशामागे संपूर्ण विद्यापीठाच्या संघभावनेने केलेल्या अथक परिश्रमांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. आयक्यूएसी (आंतरर्गत गुणवत्ता हमी कक्ष), प्राध्यापकवर्ग, प्रशासकीय कर्मचारी आणि सर्व संबंधित घटकांनी मिळून ही ऐतिहासिक कामगिरी घडवली आहे. प्र-कुलगुरु प्रा. रूबी ओझा, कुलसचिव प्रा. विलास नांदवडेकर, आयक्यूएसी संचालक प्रा. प्रज्ञा वाकपैंजन, तसेच सर्व अधिष्ठाता, लेखा व वित्त अधिकारी आदींचेही योगदान आहे, असे त्यांनी नमूद केले.

### मेट्रो ९, मेट्रो ७ अ मार्गिका प्रकल्पांना राष्ट्रीय पुरस्कार

मुंबई, दि. ३० प्रतिनिधी

मेट्रो ९ आणि मेट्रो ७ अ मार्गिका या प्रकल्पांना आरोग्य, सुरक्षा आणि पर्यावरण क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल आयआयएन-प्लॅटिनम पुरस्कार प्राप्त झाला आहे. नवी दिल्ली येथे झालेल्या इन्फ्राकॉन इंडिया नॅशनल अवॉर्ड्स २०२५ या कार्यक्रमात राष्ट्रीय दर्जाचा हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कामगार व प्रवासी यांच्या सुरक्षिततेसाठी राबवलेली प्रभावी आरोग्य व सुरक्षा उपाययोजना, बांधकाम प्रक्रियेतील पर्यावरणीय नियमांचे व सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन तसेच शहरी पायाभूत प्रकल्पांमध्ये नव्याने राबवलेली अभिनव सुरक्षा उपाययोजना या तीन निकषांवर मेट्रो मार्गिकांना पुरस्कार देण्यात आला.

